# संकेतस्थळावरील माहिती

विधि व न्याय विभाग (खुद्द), मंत्रालय , मुंबई येथे वाहन चालक (गट क ) (वेतनश्रेणी एस -६ (१९,९००-६३,२००) या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील नियमित पदभरतीच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय , मुंबई यांनी आरक्षण निश्चिती करून दिलेल्या इमाव-१ या प्रवर्गातील रिक्त पद नियमित स्वरूपात भरण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. **उपलब्ध पदसंख्या** :- ०१

३. **भरावयाच्या पदाचा सामाजिक /समांतर आरक्षणबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे** :-

| तपशिल | अजा | अज | विजाअ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आरक्षणची पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ |

४. **वेतनश्रेणी** :- एस -६ (१९,९००-६३,२००)

५. **वयोमर्यादा :-** दि.०१.जून २०२३ रोजी ३८ वर्षापेक्षा जास्त नाही

६. **शैक्षणिक अर्हता , अनुभव आणि इतर आवश्यक अटी शर्ती :-**

१. शासन मान्यता प्राप्त शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे ;

२. मोटार वाहन अधिनियम १९८८ ( १९८८ चा ५९ ) मधील तरतूदी नुसार सक्षम अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी दिलेल्या हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्यासाठी परवाना धारण केलेला असणे आवश्यक आहे .;

३. शासकिय , निमशासकिय किंवा खाजगी संस्थेमध्ये हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा तीन वर्षाहून कमी नाही इतक्या कालावधीचा अनुभव धारण केलेला असणे आवश्यक आहे ;

४. मोटार वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे ;

५. वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख आहे व चांगली शारीरिक क्षमता असणे आवश्यक आहे ;

६. संबंधित वाहन चालकास विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल. यानुषंगाने वाहनचालकास संबंधित क्षेत्राची परिपूर्ण भौगोलिक माहिती असणे आवश्यक आहे ;

७. मराठी ,हिंदी भाषा वाचता , बोलता व इंग्रजी भाषा वाचता येणे आवश्यक आहे :

८. शारीरिकदृष्ट्या पात्र असणे आवश्यक असून रातओधळेपणा व रंग आंधळेपणा या व्याधींनी ग्रस्त नसावा.

७. वाहनचालक पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने वाहन चालविण्याची चाचणी उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

८. उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज सोबत जोडलेल्या नमुन्यात कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहावा अथवा टंकलेखित करावा.

९. उमेदवाराने सदर पदाकरिता जाहिरातीच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या विहित नमुन्यात " सह सचिव (प्रशासन), ३ रा मजला, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२" या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत पाहोचेल अशा रितीने पाठवावा. अधिक माहितीसाठी ०२२-२२८८३२७६ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर तसेच विहित नमुन्यात नसलेल्या व अनावश्यक कागदपत्र जोडलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांचा तपशिल अर्जाच्या नमुन्यासोबत जोडण्यात आलेल आहे.

१०. वाहन चालक पदाच्या निवडीबाबतचे सर्व अधिकार विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे असतील. याबाबत कोणत्याही प्रकारचा राजकीय अथवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद ठरवण्यात येईल.

--------------------

# अर्जाचा नमुना

**विधि व न्याय विभाग , मंत्रालय , मुंबई येथे वाहन चालक संवर्गाच्या पदावर नियमित नियुक्ती करण्याबाबत**

उमेदवाराने
अलिकडच्या
काळातील
स्वत:चे छायाचित्र
येथे लावावे

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :-

२. अर्जदाराचा पत्ता :-

३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम :-

४. भ्रमणध्वनी क्रमांक :-

५. जन्म दिनांक व वय :-

६. शैक्षणिक अर्हता :-

७. अनुभव :-

उपरोक्त पदावर नियमित नियुक्तीबाबत जाहिरात/ सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :
दिनांक :

अर्जदाराची स्वाक्षरी

सोबत जोडावयाची कागदपत्र :-
१.वयाचा दाखला
२.शासन मान्यता प्राप्त शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण
३.हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्यासाठी परवाना
४.अनुभव प्रमाणपत्र